माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ चे कलम-१९-(३) अंतर्गत अपील-

अपील क्रमांक- २४६२/२००७

(१)- श्री अब्दुल मुनाफ शेख रसूल,
मोमिनपुरा, पातूर, जिल्हा - अकोला

डा.क्र. 249

विरुध्द

(२)- प्रथम अपीलीय अधिकारी तथा सचिव,
फक्रुद्दिन अलि अहमद उर्दू हायस्कूल,
डोणगांव, ता.- मेहकर, (जिल्हा- बुलडाणा)

(३)- जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,
फक्रुद्दिन अलि अहमद उर्दू हायस्कूल,
डोणगांव, ता.- मेहकर,

(आदेश पारित दिनांक २३ जानेवारी, २००९)

## निर्णय

अर्जदार अपीलकर्ता श्री अब्दुल मुनाफ शेख रसूल यांनी या खंडपीठाकडे, माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ चे कलम-१९-(३) अंतर्गत प्रस्तुत द्वितीय अपील-अर्ज दाखल केलेला असून, सदर अपिलाचेबाबतीत आज दिनांक २२. जानेवारी, ०९ रोजी सुनावणी घेण्यात आली असता, अर्जदार अपीलकर्ता श्री अब्दुल मुनाफ शेख रसूल हजर आहेत आणि जनमाहिती अधिकारी तथा जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, फकुद्दिन अलि अहमद उर्दू हायस्कूल, डोणगांव, ता.- मेहकर, श्री आसिफ खान तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचेतर्फे वकील श्री दापुरकर हजर आहेत

सुनावणीदरम्यान अर्जदार अपीलकर्ता श्री अब्दुल मुनाफ शेख रसूल यांचे म्हणणे असे आहे की, माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ चे तरतूदीनुसार, मागणीप्रमाणेची आवश्यक ती माहिती मिळण्यास्तव त्यांनी दिनांक १३ फेब्रुवारी, २००७ रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडे अर्ज दाखल केलेला होता. परंतु सदरील अर्जाप्रमाणेची आवश्यक ती माहिती विहित मुदतीत त्यांना देण्यात आलेली नसल्याने, त्यांनी प्रथम अपीलीय अधिकारी तथा सचिव, फक्रुद्दिन अलि अहमद उर्दू हायस्कूल, डोणगांव, ता.- मेहकर यांचेकडे आवश्यक त्या माहिती उपलब्धतेसाठी प्रथम अपील दाखल केले होते. तरीसुध्दा त्यांना आवश्यक ती माहिती संबंधितांकडून प्राप्त न झाल्याकारणाने, त्यांनी विषयांकित अधिनियम-२००५ चे कलम-१९-(३) अंतर्गत द्वितीय अपील या आयोगाकडे दाखल केलेले आहे.

जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, फक्रुद्दिन अलि अहमद उर्दू हायस्कूल, डोणगांव, ता.- मेहकर श्री आसिफ खान हजर असून, त्यांचे याबाबतीतील म्हणण्यानुसार, त्यांचे दिनांक १ मार्च, २००७ चे पत्रानुसार, अर्जदार अपीलकर्ता यांना याबाबतीत असे कळविलेले आहे की, दिनांक १३ व १४ फेब्रुवारी २००७ रोजी त्यांचा सदरीलबाबतीतील अर्ज त्यांना प्राप्त झालेला असून, त्या अर्जानुसार, त्यांना आवश्यक असलेली माहिती पाठविण्याकरिता लागणारा आवश्यक तो खर्च तसेच माहितीच्या दस्तऐवजाच्या सत्यप्रती तयार करण्याकरिता लागणारा खर्च त्यांना पाठविलेला असल्याची पावती त्यांनी पाठविलेली नसल्याकारणाने, त्यांना त्यांचे मागणीप्रमाणेची माहिती पाठविण्यास विलंब होत आहे. तरी हा खर्च त्यांनी जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, फक्रुद्दिन अलि अहमद उर्दू हायस्कूल, डोणगांव, ता.- मेहकर यांना डी.डी. द्वारे पाठविण्यात यावा. म्हणजे मागणीप्रमाणेची आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन देता येईल. सदरील पत्र अर्जदार अपीलकर्ता यांना दिनांक १० मार्च, २००७ रोजी प्राप्त झालेले असल्याचे मान्य केलेले आहे. अर्जदार अपीलकर्ता यांचे याबाबतीतील म्हणण्यानुसार, त्यांना पाठविलेल्या पत्रामध्ये त्यासाठी लागणारी किती रक्कम पाठवावयाची आहे, याबाबतचा कोणताही उल्लेख केलेला नसल्यामुळे, त्यांनी लागणारी रक्कम पाठविलेली नाही. तसेच, पुढेसुध्दा किती रक्कम पाठवावयाची किंवा कसे, याबाबतसुध्दा त्यांना कोणताही पत्रव्यवहार केलेला नाही. याबाबतीत जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, फकुद्दिन अलि अहमद उर्दू हायस्कूल, यांचे म्हणण्यानुसार त्यांनी याबाबतीत दिनांक २४ मार्च, २००७ रोजी पुन्हा पत्र पाठवून, याबाबतीत त्यांनी खुलासा केलेला आहे की, अर्जदार अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही वीस वर्षांचे कालावधीशी आधारित आहे आणि बरेचशी माहिती ही त्यांचे अखत्यारितील नाही म्हणून त्यांना सूचित करण्यात येते की, त्यांचे मागणीप्रमाणे मागितलेली माहिती जी शाळेत उपलब्ध आहे, ती संकलित करण्यात आलेली असून, त्याच्या लहानमोठ्या प्रतींची संख्या मिळून, एकूण सर्व १५०० प्रती झालेल्या असून,

मनीऑर्डरने किंवा जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयात ती रक्कम प्रदान करण्यात यावी. याबाबतीतील सदरील लागणारा खर्च हा येत्या १५ दिवसांचे आंत जमा करण्यात यावा. वरील सर्व खर्च कार्यालयात जमा होताच, मागणीप्रमाणेची आवश्यक असलेली माहिती टपालाद्वारे पाठविण्यात येईल.

सदरील खर्च हा आपण शाळेकडे न भरल्यास, मागणीप्रमाणेची आवश्यक असलेली माहिती उपलब्ध करुन देता येणार नाही. अर्जदार अपीलकर्ता यांना जन माहिती अधिकारी यांनी यापुढे असेही कळविले आहे की, शाळेकडे जमा करण्यात आलेली रक्कम कमी खर्च झाल्यास, उर्वरित रक्कम त्यांना परत करण्यात येईल आणि त्यापेक्षा जास्त खर्च झाल्यास, त्यांचेकडून जास्तीची रक्कम त्यांना शाळेचे कार्यालयात जमा करावी लागेल. अर्जदार अपीलकर्ता म्हणून त्यांनी त्यांचे दिनांक १३ मार्च, २००७ चे पाठविलेल्या पत्रात, पत्रव्यवहारामध्ये जो विलंब झाला किंवा दिशाभूल करण्याबाबतचा जो आरोप लावण्यात आलेला आहे, तो बरोबर नाही. करण्यात आलेला पत्रव्यवहार हा कालमर्यादेतच झालेला आहे आणि त्यांची दिशाभूल जन माहिती अधिकारी यांचेकडून झालेली नसल्याचे कळविलेले आहे.

उपरोक्त सर्व बाबींचा विचार करता, जन माहिती अधिकारी यांनी प्रस्तुत सुनावणीदरम्यान अर्जदार अपीलकर्ता यांना आवश्यक ती मागणीप्रमाणेची माहिती उपलब्ध करुन देण्याबाबतची तयारी दाखविलेली असून, याबाबतीत अर्जदार अपीलकर्ता यांचे मतानुसार, सदरील माहिती त्यांना उपलब्ध करुन देण्याबाबतची विहित मुदत म्हणजे ३० दिवसाचा कालावधी हा संपलेला असल्याने, त्यांना आवश्यक असलेली माहिती ही विनामूल्य उपलब्ध करुन द्यावयास पाहिजे आणि म्हणून अर्जदार अपीलकर्ता यांनी याबाबतीतील लागणारी रक्कम न भरता, जन माहिती अधिकारी यांचेकडे मागणीप्रमाणेचे आवश्यक त्या दस्तऐवज उपलब्धतेसाठी सारखा तगादा लावलेला असल्याचे दिसून येते. तसेच, जन माहिती अधिकारी यांचीसुध्दा, याबाबतीतील आवश्यक असलेली माहिती देण्याची तयारी असून, अर्जदार अपीलकर्ता यांनी त्यासाठीचे शुल्क न भरताही त्यांना आवश्यक ती मागणीप्रमाणेची माहिती उपलब्ध करुन देण्यास ते तयार असल्याचे दिसून येते.

प्रस्तुत अपीलाचे सुनावणीदरम्यान उभय बाजूचे म्हणणे ऐकल्यानंतर जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, फक्रुद्दिन अलि अहमद उर्दू हायस्कूल, डोणगांव हे अर्जदार अपीलकर्ता यांना, मागणीप्रमाणेचा आवश्यक तो दस्तऐवज विनामूल्य उपलब्ध करुन देण्यास तयार झालेले असून, अर्जदार अपीलकर्ता हेसुध्दा आवश्यक तो त्यांचे मागणीप्रमाणेचा दस्तऐवज घेण्यास तयार झाले आहेत आणि त्यासाठी दिनांक १० फेब्रुवारी, २००९ रोजी कार्यालयीन वेळेत म्हणजे सकाळी ११-०० ते सायंकाळी ५-०० वाजेपावेतो, अर्जदार अपीलकर्ता यांना आवश्यक असलेला मागणीप्रमाणेचा दस्तऐवज उपलब्ध करुन देण्याबाबत जनमाहिती अधिकारी यांनी तशी कार्यवाही करावी व अर्जदार अपीलकर्ता यांनी सदरील आवश्यक असलेला दस्तऐवज प्राप्त करुन घ्यावा. याप्रमाणे अर्जदार अपीलकर्ता यांना मागणीप्रमाणेचा आवश्यक असलेला दस्तऐवज विनामूल्य प्राप्त होत असल्याने, त्यांची याबाबतीत कोणतीही उजर शिल्लक राहिलेली नाही.

वरील सर्व बाबींचा तपशीलवारपणे विचार करता, अर्जदार अपीलकर्ता यांचे मागणीप्रमाणेची आवश्यक ती माहिती उपलब्ध झालेली असल्याचेबाबतीत समाधान झालेले असल्याने, प्रस्तुत अपील हे निकालात काढण्यात येते.

(भास्कर पाटील),
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
अमरावती खंडपीठ, अमरावती

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ, अमरावती यांचे-समोरील माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ चे कलम-१९-(३) अंतर्गत अपील-**

अपील क्रमांक- २४६३/२००७

(१)- श्री माधव मारोतराव सुरोशे, यवतमाळ,
रा.- वेणी (खुर्द), पोस्ट- हर्षी,
ता.- पुसद, जिल्हा- यवतमाळ

विरुध्द

(२)- प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उप-विभागीय अधिकारी, पुसद
ता.- पुसद, जिल्हा- यवतमाळ

(३)- जनमाहिती अधिकारी तथा
तहसीलदार, महागांव,
जिल्हा- यवतमाळ

(आदेश पारित दिनांक १५ जानेवारी, २००९)

निर्णय

अपीलकर्ता यांचा पुकारा केला असता, ते गैरहजर आहेत. उत्तरवादी हजर ाहेत. मागील तारीख दिनांक ३० डिसेंबर, २००८ रोजीचे निर्धारित तारखेचे दिवशीसुध्दा अर्जदार श्री ाधव मारोतराव सुरोशे हे गैरहजर होते. गैरहजरीबाबत त्यांचा कोणताही अर्जवगैरे प्राप्त झालेला ाही वा तसे कळविण्यात आलेले नाही. सदरीलबाबतीत आजचे दिनांक १५ जानेवारी, २००९ चे ार्धारित तारखेची त्यांना अखेरची संधी म्हणून देण्यात आलेली होती. तथापि, आज दुपारी १-३० जेपावेतो त्यांचे उपस्थितिबाबत दोनदा पुकारा केला असता, ते गैरहजर असल्याचे आढळून आले ाहे. त्यामुळे अर्जदार यांनी मागितलेल्या माहितीस्तव प्राप्तिचेदृष्टीने ते इच्छुक असल्याचे दिसून येत ाही. सबब, याबाबतीत त्यांनी केलेले अपील खारिज करण्यात येत आहे.

नांक १५ जानेवारी, २००९

(भास्कर पाटील)
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ,
अमरावती

मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ, अमरावती यांचे-समोरील

माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ चे कलम-१९-(३) अंतर्गत अपील- 2844/2006

अपील क्रमांक- २४७०/२००७

(१)- श्री मुकुंदा पांडुरंग घोराडे,
रा.- वडी, पो.- नायगांव,
ता.- नांदुरा, जिल्हा- बुलडाणा

विरुध्द

(२)- प्रथम अपीलीय अधिकारी तथा
जिल्हा उप-निबंधक, सह. संस्था, बुलडाणा

(३)- जनमाहिती अधिकारी तथा
सचिव, कृषी उत्पन्न बाजार समिती, नांदुरा
ता.-नांदुरा, (जिल्हा- बुलडाणा)

(आदेश पारित दिनांक १६ जानेवारी, २००९)

निर्णय

अपीलकर्ता श्री मुकुंदा पांडुरंग घोराडे, रा.- वडी, पो.- नायगांव, ता.- नांदुरा, यांनी या खंडपीठाकडे, माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ चे कलम-१९-(३) अंतर्गत प्रस्तुत द्वितीय अपील-अर्ज दाखल केलेला असून, सदर अपिलाचेबाबतीत आज दिनांक १६ जानेवारी, ०९ रोजी सुनावणी घेण्यात आली असता, अपीलकर्ता श्री मुकुंदा पांडुरंग घोराडे आणि जनमाहिती अधिकारी सहायक निबंधक, सहकारी संस्था, श्री एम एस भगत हे व त्यांचेवतीने श्री जैन वकील हजर आहेत. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी जिल्हा उप-निबंधक, सहकारी संस्था, बुलडाणा श्री खरात हे हजर आहेत आणि सुनावणीदरम्यान उभय पक्षांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. सदरील अपिलाचेबाबतीत खालीलप्रमाणे आदेशित करण्यात येत आहे.

अर्जदार अपीलकर्ता श्री मुकुंदा पांडुरंग घोराडे यांनी दिनांक १६ मार्च, २००७ रोजी कृषी उत्पन्न बाजार समिती, नांदुरा येथे त्यांना आवश्यक असलेल्या माहितीसाठी अर्ज केलेला असून त्यानुसार त्यांनी माहिती मागितलेली होती. त्या वेळेस तेथे कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव म्हणून श्री वा.म.भोंगे हे कार्यरत होते आणि ते दिनांक ३१ मार्च, २००८ रोजी सेवानिवृत्त झाले आहेत. त्यानंतर श्री भगत यांनी सचिव श्री भोंगे यांचा कार्यभार घेतला असून, श्री घोंगे यांचे कार्यकालावधीत अपीलकर्ता यांना पाहिजे असलेली माहिती प्राप्त होण्यास उशिर झालेला आहे आणि याबाबत आवश्यक ती माहिती देण्यास झालेल्या विलंबाबत ते कारण सांगण्यास असमर्थ आहेत. श्री घोंगे हे हजर नाहीत.

जनमाहिती अधिकारी यांचे म्हणण्यानुसार दिनांक १९ मे, २००७ रोजी अर्जदार अपीलकर्ता यांचे वडिल त्यांना आवश्यक असलेली माहिती कार्यालयात येऊन घेऊन गेलेले आहेत, आता त्यांना कोणतीही माहिती नको आहे. तरीसुध्दा अर्जदार अपीलकर्ता यांची तक्रार अशी आहे की, त्यांनी कित्येक वेळेस जनमाहिती अधिकारी यांचेकडे जाऊन आवश्यक त्या माहितीची मागणी केली असता, त्यांना टाळाटाळीचे उत्तर देण्यात आलेले आहे. अपीलकर्ता यांना आवश्यक असलेली माहिती ही कार्यालयात उपलब्ध असूनसुध्दा त्यांनी ती पाहिजे असलेली माहिती मिळालेली नसल्यामुळे, अखेरीस त्यांनी उपोषणास बसण्याचे पध्दतीचा अवलंब करावा लागला.

वरील अपील प्रकरणात पूर्ण चौकशीअंती असे दिसून येते की, जनमाहिती अधिकारी म्हणून त्यावेळी कार्यरत असलेले सचिव यांचेकडून अपीलकर्ता यांना आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन देण्याचेबाबतीत झालेल्या विलंबाचे कार्यवाहीअनुषंगाने त्या खात्याचे सेवानियमानुसार त्यांचेविरुध्द खातेचौकशी करण्याचेबाबतीत संबंधित अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात यावी.

कृषी उत्पन्न बाजार समितीचे कायद्यानुसार सभापती वा संचालक मंडळ, कृषी उत्पन्न बाजार समिती, नांदुरा यांनी याबाबतीत आवश्यक ती माहिती अर्जदार अपीलकर्ता यांना वेळेचे आंत कां दिलेली नाही, याबाबत चौकशी करण्यात यावी आणि तसा अहवाल या कार्यालयास सादर करण्यात यावा आणि ही प्रक्रिया दोन महिन्यांचे कालावधीत पूर्ण करण्यात यावी. सदरीलबाबतीतील चौकशी अहवाल दाखल केल्यानंतर तत्संबंधी काय निर्णय घ्यावयाचा आहे, ते श्री भोंगे यांना बोलावून व सदरीलबाबतीत त्यांचे म्हणणे ऐकल्यानंतर अंतिमतः निर्णय घेण्यात येईल. अपीलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

(भास्कर पाटील),
राज्य माहिती आयुक्त,